# ‘गुन्हे टाळण्यासाठी सतर्कता गरजेची’



कोरेगाव (ता.उमरगा) : जनजागृती उपक्रमात प्रतीक्षा पांगे यांनी ग्रामस्थांना जनजागृतीचे फलक दिले.

उमरगा, ता. २० (बातमीदार): आधुनिक तंत्रज्ञानामुळे मोबाईल व इंटरनेटचा वापर वाढला आहे. तंत्रज्ञानामुळे एका क्लिकवर संपूर्ण जगाची माहिती समोर येत असली तरी मोबाईलचा वापर करताना सायबर गुन्हे टाळण्यासाठी प्रत्येकांनी सतर्कता बाळगली पाहिजे, असे मत लातूरच्या राजर्षी शाहू महाविद्यालयाची विद्यर्थिनी प्रतिक्षा पांगे यांनी व्यक्त केले.

क्लिक हिल फॉऊंडेशन पुणे व राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर यांच्यावतीने सायबर शिक्षा, सायबर सुरक्षा उपक्रमांतर्गत शनिवारी (ता.१८) कोरेगाव (ता. उमरगा) येथे आयोजित कार्यक्रमात शाहू महाविद्यालयात बी.एस्सी (सीएस) तृतीय वर्गात शिकणारी प्रतिक्षा पांगे यांनी सायबर सुरक्षेबाबत जनजागृती केली.

यावेळी सरपंच राजश्री सुर्यवंशी, उपसरपंच पांडुरंग खटके, ग्रामसेवक जी. एस. बुलबुले, माजी सरपंच कोर्डीबा पांगे आदींची उपस्थिती होती. पांगे पुढे बोलताना म्हणाल्या की, बहुतांश शेतकरी, ग्रामस्थ व तरूणांच्या हातात मोबाईल आहे. इंटरनेटच्या माध्यमातून विविध प्रकारची माहिती उपलब्ध होत असली तरी सायबर गुन्हे टाळण्यासाठी अनावधनाने होणाऱ्या चुका होऊ नयेत. स्वतःची माहिती अनोळखी व्यक्तींना न देणे, चुकीच्या वेबसाईट्सच्या लिंक्स क्लिक न करणे, अपराधाला बळी पडल्यानंतर न घाबरता माहिती घेणे, स्वतः बरोबरच कुटुंब व नातेवाईकांना याबाबत सतर्क करणे या अनुषंगाने पांगे यांनी जनजागृती केली. यावेळी पांगे त्यांचे वडिल रमेश पांगे यांचा ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आला. शेतकरी, ग्रामस्थ व तरुणांची यावेळी उपस्थिती होती.